## गोंडवाना विद्यापीठात गणेशोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर

**गडचिरोली :** गणेशोत्सव या राज्य महोत्सवाचे औचित्य साधून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने आदर्श पदवी महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि गोंडवाना विद्यापीठ कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, महिला व युवक-युवती मोठ्या संख्येने सहभागी झाले.

रक्तदान शिबिरादरम्यान अनेकांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. 'रक्तदान हेच महादान' या घोषवाक्याशी एकरूप होत सहभागी झालेल्यानी दिलेल्या प्रतिसादामुळे शिबिराला उत्स्फूर्त वातावरण लाभले.

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली संपूर्ण शिबिर सुरळीतपणे पार पडले. या यशस्वी आयोजनासाठी आदर्श पदवी महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, रसेयो विभाग आणि गोंडवाना विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जनता दरबारात नागरिकांनी घेतली अधिकाऱ्यांची झडती

### प्रलंबित समस्यांना घेऊन अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीचे वाभाळे

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** आरमोरी विधानसभा क्षेत्राचे आ. रामदास मसराम यांच्या जनता दरबारात हजारोंच्या संख्येने उपस्थित नागरिकांनीच आक्रमक भूमिका घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांची झडती घेतली. शासकीय यंत्रणेकडून होणारी कामकाजातील हयगय, प्रलंबित समस्या, अडचणी आक्रमपणे मांडत प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या कार्यप्रणालीचे वाभाळे काढले.

आ. रामदास मसराम यांच्या उपस्थितीत येथील किसान सभागृहात गुरुवारी (दि. २८)



जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या उपस्थित नागरिकांनी शासकीय यंत्रणेच्या कारभाराप्रती नाराजी व्यक्त आक्रमक भूमिका घेतली. यावेळी सती नदीचे रखडलेले पूलाचे व राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम, नगर पंचायत अंतर्गत रखडलेले घरकूल बांधकाम, वनपट्टे, शेतीचा सातबा. रा उतारा, वारसानची नोंद घेण्यास होणारा विलंब, कुरखेडा येथील दारूबंदी व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेचे गढूळ पाणी, तालुक्यातील प्रलंबित पांदण रस्त्यांची कामे, रखडलेले व खड्डेमय रस्ते तसेच तालुक्यात युरीया खताची निर्माण झालेली टंचाई व शासकीय दरापेक्षा अधिक दराने होणारी विक्री, घाटी येथील रखडलेली पाणीपुरवठा योजना, नवेझरी येथील शिक्षकांचा प्रश्न आदींसह विविध प्रश्नांचा भडीमार करीत नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांची भंबेरी उडविली.

#### जनतेच्या समस्यांना प्राधान्य द्या : आ. मसराम

नागरिकांनी अधिकाऱ्यांवर प्रश्नांची सरबत्ती ५ तास गाजलेल्या या जनता दरबारात करीत भंबेरी उडविली होती. यादरम्यान आ. रामदास मसराम यांनीही सर्वच विभागाच्या अधिक. ऱ्यांना धारेवर धरत जाब विच. ारला. नागरिकांच्या समस्या प्राधान्याने क्रमाने घेत कामकाजात गती आणण्याचे निर्देश त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

याप्रसंगी तहसीलदार राज. कुमार धनबाते, काँग्रेसचे जीवन नाट, जयंत हरडे, माजी जि.प. सदस्य प्रभाकर तुलावी, माजी जि. प. सदस्य नंदू नरोटे, माजी पं. स. सभापती गिरीधर तितराम, देसाईगंजचे माजी पं.स. सभापती परसराम टिकले, माजी उपसभापती श्रीराम दुगा, माजी उपसभापती नवनाथ धाबेकर, आशिष काळे आदी उपस्थित होते.

## एटापल्लीत ३१ गणेशभक्तांनी केले रक्तदान



**तालुका प्रतिनिधी**
**एटापल्ली दि. ३० :** गणेशोत्सव केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक जाणीवेचे प्रतीक ठरावे, या उद्देशाने श्री सार्वजनिक युवा गणेश मंडळ, बस स्थानक एटापल्ली यांच्या वतीने २८ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबिर व सर्वसामान्यांसाठी आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले. रक्तदान शिबिरात ३१ गणेशभक्तांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली.

२८ ऑगस्ट रोजी सकाळपासून बस स्थानक परिसरात हे शिबिर पार पडले. आरोग्य शिबिराचे उद्घाटन शहरातील प्रतिष्ठित नागरिक राजगोपाल सुल्वावार, सत्यनारायण गुंडावार, संतोष गंदे. शिरवार, पंकज पत्तीवार व गणेश खेडेकर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी नागरिकांची मोठी उपस्थिती होती. तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. भूषण चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील आरोग्य पथकाने शिबिराचे उत्कृ ष्ट नियोजन केले. या शिबिरात तब्बल ११० नागरिकांची तपासणी करून त्वरित उपचार उपलब्ध करून देण्यात आले. डेंग्यू, मलेरिया, हिवताप, सिकलसेल व इतर आजारांच्या तपासण्या करण्यात आल्या. यानंतर रक्तदान शिबिर पार पडले. यात मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला. एकूण ३१ जणांनी स्वेच्छेने रक्तदान करून समा. जाप्रती आपली बांधिलकी अधोरेखित केली.

या उपक्रमाबाबत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नाही, तर तो समाजहिताचा संदेश घेऊन येतो. रक्तदान व आरोग्य तपासणीसारखे उपक्रम नागरिक. ांना आरोग्यदायी जीवनाकडे नेतात, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

शिबिरात यांनी केले रक्तदान

राघवेंद्र सुल्वावार, उमेश संगर्ती, अनिकेत मामीडवार, संपत पैडाकूलवार, ओमकार मोहुर्ले, वाजीद शेख, राकेश तेलकुंटलवार, समिर चंद्रशेखर, अजय अधिकारि, निखिल गाद. ्वार, राहूल कुळमेथे, अमजत पठाण, सुरज मंडल, राहूल मेश्राम, तुषार पवार, हर्षद शेख, प्रशांत मंडल, प्रज्वल नागुलवार, मंगेश गावडे, महेश पुल्लूरवार, डॉ. तुपेश उईके, सुकेश हिरा, संस्कार पुल्लूरवार, गौरव पेटकर, संघपाल बोरकर, सचिन गडमवार, सुजल वाघमारे, आतिष खापणे, रोशन सोनी, अदित्य चिप्पावार, कुमार बिहारी यांचा समावेश आहे.

## आलापल्लीत बारा अल्पवयीन वाहनचालकांवर कारवाई

### अहेरी पोलिसांची धडक मोहीम

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** पोलीस अधीक्षक निलोत्पल यांच्या निर्देशानुसार, वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आणि अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी आलापल्ली शहरात वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. याच मोहिमेअंतर्गत, आलापल्ली पोलिसांनी गुरुवारी २८ ऑगस्ट रोजी १२ अल्पवयीन दुचाकी चालकांवर दंडात्मक कारवाई करून त्यांच्या गाड्या जप्त केल्या.

पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी जिल्ह्यामध्ये बेजबाबदार वाहन चालकांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाचे पालन करत आलापल्ली येथे वाहतूक नियमांची तपासणी मोहीम राबवण्यात आली. या तपासणीत, १२ अल्पवयीन मुले



आणि मुली दुचाकी चालवताना आढळल्या. पोलिसांनी तात्काळ त्यांच्यावर कारवाई करून १२ दुचाकी गाड्या ताब्यात घेतल्या. लहान मुलांच्या दुचाकी चालवण्यामुळे अनेक अपघात झाल्याचे दिसून येते, त्यामुळे पालकांनी मुलांना वाहने देऊ नयेत. भविष्यात, जर पुन्हा अल्पवयीन मुले-मुली दुचाकी चालवताना आढळल्यास, त्यांच्या पालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक हर्षल ओकरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक देवेंद्र पटले, पोलीस हवालदार विजय कुमरे, नापोशि ज्ञानेश्वर निलावार, आणि मपोशि पूजा पाटील यांनी अप्पर पोलिस अधीक्षक सत्यसाई कार्तीक, उपविभागीय पोलिस अधिकारी अजय कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे. ही मोहीम गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते सुरक्षित करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल असून, यामुळे बेकायदेशीरपणे वाहन चालवणाऱ्यांवर आळा बसण्यास मदत होईल अशी अपेक्षा आहे.

## दुचाकीची उभ्या ट्रकला धडक; युवक गंभीर जखमी

### कुरखेडा-देसाईगंज मार्गावरील घटना

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** गेवर्धा येथून कुरखेडा येथे संगणक प्रशिक्षणासाठी निघालेल्या दोन युवकांच्या दुचाकीला वडसा मार्गावर धर्मकाटा जवळ रस्त्यावर उभ्या असलेल्या ट्रकला धडकल्याने भीषण अपघात घडला. या अपघातात कुणाल डांबोळे (१८) हा युवक गंभीर जखमी झाला असून, त्याच्यासोबत असलेला कृ णाल कांबळे (१९) यालाही किरकोळ दुखापत झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार, कुणाल आणि कृणाल यांची दुचाकी (क्रमांक एमएच ३३ आर ९५६४) वडसा मार्गावर वजनासाठी थांबलेल्या ट्रकला (क्रमांक सीजी०४ एचडब्ल्यू ३०२९) मागून धडकली. या धडकेत कुणालच्या डोक्याला जबर मार लागल्याने रक्तस्त्राव सुरू झाला. याच मार्गाने वडसा येथे निघालेले आप जिल्हा अध्यक्ष नसीर हाशमी यांनी



तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी युवकांना मदत केली आणि त्यांना कुरखेडा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तसेच, त्यांनी घटनेची माहिती कुरखेडा पोलिस ठाण्याचे निरीक्षक महेंद्र वाघ यांना दिली.

कुरखेडा येथे प्राथमिक उपच. ारानंतर कुणालची प्रकृती गंभीर असल्याने त्याला ब्रम्हपुरी येथील रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे तपासणीत त्याला मल्टिपल फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाले असून, सध्या त्याची प्रकृती स्थिर आहे.

हाशमी यांनी रस्त्यावर वाहन उभे ठेवून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या आणि लोकांच्या जीवाला धोका निर्माण करणाऱ्या ट्रक चालकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. कुरखेडा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठून सदर ट्रक ताब्यात घेतला असून, चालका. विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात रस्त्यावरील वाहन पार्किंगच्या समस्येवर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

## आरमोरीत आढळला दुर्मिळ कॅमेलियन सरडा

**शहर प्रतिनिधी**
**आरमोरी दि. ३० :** शहरातील आरमोरी- वडसा मार्गावर अत्यंत दुर्मिळ असलेल्या कॅमेलियन सरडा शुक्रवारी (दि. २९) दुपारच्या वृक्षवल्ली वन्यजीव संरक्षण संस्थेचे सहसचिव तथा सर्पमित्र दीपक सोनकुसरे यांना आढळून आला. हा सरडा अत्यंत दुर्मिळ असून, या सरड्याविषयी समाजात गैरसमज असल्याने याला विषारी समजून मारले जाते. त्यामुळे ही प्रजाती लुप्त होण्याच्या मार्गावर असल्याची मा. हती सोनकुसरे यांनी दिली.

दुर्मिळ सरडा कॅमेलियन जाती. चा असल्याचे समजताच याची मा. हती आरमोरी येथील वन्यजीव मित्र देवानंद दुमाने यांना देण्यात आली. या सरड्याला सुरक्षित पकडून त्याच्या अधिवासात सोडण्यात आले. या दुर्मिळ सरड्याचे जगात १८ कुळे असून, सरड्याच्या ४५०० प्रजाती आहेत. ग्रीन कॅमेलियन सरडा त्वचेखाली असलेल्या रंगद्रव्यामुळे



रंग बदलण्यात माहीर असणारा सरडा असे या प्रजातीला ओळखले जाते. वातावरणानुसार रंग बदलत जाणारे सरडे अनेक असले तरी हा हिरवा रंगाचा सरडा दुर्मिळ समजला जातो. ज्या झाडावर हा सरडा असतो त्या झाडाच्या पानाच्या रंगाप्रमाने तो आपल्या रंगाची छटा बदलतो. ह्या सरड्याच्या गळ्यावर आणि पोटावर पांढऱ्या काट्याची ओळ दिसून येते. किडे व फुलपाखरू असे प्रामुख्याने खाद्य असलेला हा सरडा इतर सरड्याच्या तुलनेत संथ व अलगद चालतो. गवताच्या रंगरुपात एकरूप होत असल्याने तो सहसा नजरेला येत नाही.

## आशा स्वयंसेविका पदभरती नव्याने घ्या

### वंचित बहुजन आघाडीची मागणी

**शहर प्रतिनिधी**
**देसाईगंज दि. ३० :** तालुक्यातील कुरुड प्राथमिक आरोग्य केन्द्राअंतर्गत करण्यात आलेल्या आशास्वयंसेविका पदभरतीत भ्रष्टाचार झाला असुन निवड समिती ने नियम धाब्यावर बसवुन पात्र विधवा महिलेला डावलले. याविषयी योग्य चौकशी करुन भरती प्रक्रिया रद्द करुन पारदर्शी पद्धतीने निवड प्रक्रिया राबवावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार प्रिती डुडुलकर मार्फत मुख्यमंत्री तथा जिल्हूयाचे पालकमंत्री, आरोग्य मंत्री, जिल्हा मुख्य कार्यपालन अधिकार, जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कुरुड येथिल रहिवासी असलेल्या कल्याणी महेश वासनिक या विधवा महिलेसह ६३ महिलांनी आशावर्कर च्या २ पदांसाठी आपले आवेदनत्र



तालुका वैद्यकिय अधिकारी देसाईगंज यांचेकडे सादर केले होते. उच्चशिक्षित असलेल्या कल्याणी वासनिक यांना निवड समिती सचिव डॉ. पत्रू सडमाके यांनी २० हजार रुपयाची मागणी केली. मात्र पैसे न दिल्याने सदर महिलेला मौखिक परिक्षेत कमी गुण देऊन भरती प्रक्रियेतुन बाद करण्यात आले. हा सुशिक्षित विधवा महिलेवर अन्याय असुन या प्रकरणाची सखोल चौकशी करुन सदर भरती प्रक्रिया पारदर्शी पद्धतीने पार पाडण्यासाठी पुन्हा निवड प्रक्रिया राबवुन व्हिडीओ कॉन्फ्रंसी रेकॉर्डींग करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.

तहसिलदार यांना निवेदन देताना कल्याणी वासनिक यांचेसह वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव राजरतन मेश्राम, जिल्हा उपाध्यक्ष प्रा. भीमराव शेन्डे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रद्न्या निमगडे, तालुका अध्यक्ष विनोद मेश्राम, शहर अध्यक्ष प्रा. अशोक मेश्राम, दिलीप बन्सोड, इंजि. प्रमोद मेश्राम, कुंदा झाडे, भारती मेश्राम, कुमता मेश्राम, ज्योती दहिकर, रविना मेश्राम, प्राजक्ता मेश्राम, अक्षता ठवरे, प्रिया घोडेस्वार, विजय मेश्राम, प्रियंका बोरकर, मनिषा गणविर यांचेसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## कसनसूर येथील उपकेंद्राचे काम निधी अभावी प्रलंबित

### ग्रामसभांच्या पदाधिकाऱ्यांचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे यांच्याकडे निवेदन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** एटापल्ली तालुक्यातील कसनसूर येथे ३३/११ केव्ही उपकेंद्र मंजूर करण्यात आले. मात्र निधी अभावी त्याचे बांधकाम रखडलेले असून त्यामुळे परिसरातील ७०-८० गावांना विजेच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. नियमित वीज पुरवठा होत नसल्याने कसनसूर परिसरातील ग्रामपंचायत सरपंच ग्रामसभेचे पदा. धिकारी यांनी गडचिरोली काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांची भेट घेवून सदर उपकेंद्राला निधी उपलब्ध करून देवून काम सुरू करावे, अशी मागणी निवेदनातून केली आहे.



सद्या स्थितीत एटापल्ली उपक. ेंद्रावरून कसनसूर परिसरातील गावांना वीज पुरवठा होत असून एटापल्ली चे उपकेंद्र ५० किमी अंतरावर असल्याने पावसाळ्यात वारंवार वादळ-वाऱ्यामुळे वीजपुरवठा खंडित होतो. परिणामी नागरिकांना महिनो महिने अंधारात राहावे लागते. शाळा, रुग्णालये व शासकीय कार्यालये यावरदेखील गंभीर परिणाम होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री असून ऊर्जा खाते सुद्धा त्यांच्याकडे असताना व एटापल्ली तालुक्यातील सुरजागड खदानीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल जिल्ह्यात जमा होत असताना देखील त्याच तालुक्यातील नागरिकांना निधी अभावी दिवसेंदिवस अंधारात राहावे लागत आहे. ही मोठी शोकांतिका असून सदर गावात तातडीने वीज पुरवठा न झाल्यास व कसनसूर येथील ३३ /११ केव्ही उपकेंद्राक. रिता निधी उपलब्ध करून न दिल्यास परिसरातील ग्रामस्थांना घेऊन ठिय्या आंदोलन करण्याचा इशारा गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राह्मणवाडे यांनी दिला आहे.

यावेळी कसनुसरचे माजी सरपंच सुनील मडावी, वेणारा ईकाला अध्यक्ष सुधाकर गोटा, मान. ेवाराचे उपसरपंच देविदास मट्टामी, कोटमीचे उपसरपंच महादेव पदा, वाघेझरीचे सरपंच विलास कोंदामि, जवेली बु. सरपंच अलिशा गोटा, आदी उपस्थित होते.

# पावसाच्या रिपरिपीतही कलाउत्सवाने विद्यार्थ्यांमध्ये आणली रंगत

### देसाईगंज गट साधन केंद्रात आयोजन

**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि. ३० :** शारी. रिक शिक्षण व साक्षरता विभाग तथा शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मार्गदर्शनाखाली 'बारा कलांचा आविष्कारः- कला उत्सव' स्पर्धेचे आयोजन शुक्रवार २९ ऑगस्ट रोजी गट साधन केंद्र येथे करण्यात आले होते. पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये इयत्ता ९ ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून बाराही कला प्रकारात रंगत आणली. दरम्यान पावसाची



रिपरिप सुरू असतानाही सदर कार्यक्रम पाहण्यासाठी गट साधन केंद्रातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह फुल्ल झाला होता.

या स्पर्धात्मक कार्येक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशिक्षणाधिकारी यशवंत टेंभुर्णे होते. उद्घाटन गटसमन्वयक एकनाथ पिलारे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून किसान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जगदिश केळझरकर, मुख्याध्यापिका शमीम बानो कुरेशी, डॉ. चंद्रशेखर बांबोळे आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

'विकसीत भारत २०४७ मधील भारताची कल्पना' असा या स्पर्धेतील आशय होता. यात एकुण १२ कला प्रकाराचा समावेश होता. या सर्व प्रकारात तालुक्यातील एकुण २३ शाळांमधील विद्यार्थ्यां सहभागी झाले होते. एकल गायन या प्रकारात विनायक विद्यालय विसोरा येथील डिंपल नाकाडे, समूह गायन- शिवाजी विद्यालय तुळशी येथील अंजली दुनेदार आणि संच, एकल स्वरवाद्य- युवक विद्यालय विहिरगाव मधील क्रिष्णा दिघोरे, तालवाद्य - म.गांधी विद्यालय देसाईगंज - यश पर्वते, एकल नृत्य -डेव्हीड किर्ती इंग्लीश स्कुल देसाईगंज येथील करीश्मा राऊत, समूह नृत्य मध्ये रेणूकाबाई उके विद्यालय शिवराजपुर येथील सुकन्या कोडापे व संच, दृश्यकला द्विआयामी- कुथे पाटील ज्यु. कॉलेज-सुजल मुद्दलवार, दृश्यकला त्रिआयामी-आदर्श न्यु इंग्लीश हायस्कूल -देविदास पाठक, पारंपारिक गोष्ट/कथाकथन-कृ तीका ढोरे जि.प.हायस्कुल कुरुड व लघूनाटीका या कला प्रकारात कृ तीका ढोरे यांची अव्वलस्थानी निवड झाली.

गुणानुक्रमे प्रथम आलेल्या स्पर्धक विद्यार्थ्यांचे कौतुक करून अभिनंदन करण्यात आले. या बाराही कला प्रकाराच्या स्पर्धांचे परीक्षक व गुणलेखक म्हणून तालुक्यातील वेगवेगळ्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना पाचारण करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विषय साधन व्यक्ती अरविंद घुटके यांनी तर संचालन विष्णू दुनेदार आणि आभारप्रदर्शन लक्ष्मन सुखदेवे यांनी केले.

## रूग्णालयाची बाह्यरूग्ण सेवा प्रभावित

**अहेरीः** शासकीय सेवेत कायम करून घेण्यात यावे, या मुख्य मागणीसह इतर मागण्यांना घेऊन राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्टपासून कामबंद आंदोलन पुकारले आहे. १२ दिवसानंतरही बेमुदत कामबंद आंदोलन सुरू असून, या आंदोलनात अहेरी उपजिल्हा रुग्णालयातील परिचारिकांसह अन्य कर्मचारी सहभागी झाले असल्याने रुग्णालयीन बाह्यरुग्ण सेवा प्रभावित झाली असून, रुग्णांची प्रचंड हेळसांड होत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १४ मार्च २०२४ च्या निर्णयानुसार नियमित शासन सेवेत समायोजन करण्यात यावे, बदली धोरण, वेतनवाढ, ईपीएफ, आरोग्य व अपघात विमा आदी मागण्यांना घेऊन राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जिल्हाभरात कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्टपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही, तोपर्यंत आंदोलन कायम राहिल, असा ठाम निर्धार संघटनेच्या नेतृत्वात कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. या आंदोलनात अहेरी उपजिल्हा रुग्णालयातील कंत्राटी परिचारिक. ांसह कर्मचारीही सहभागी झाले आहेत. शासनाद्वारे कोणताही तोडगा काढण्यात न आल्याने १२ दिवसांपासून सदर आंदोलन कायम आहे. कर्मचाऱ्यांच्या या कामबंद आंदोलनात प्रशासकीय कामकाजासह आरोग्य सेवेवरही परिणाम पडला आहे.

RNI No-MAHMAR 2010/35845
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९४०५६६०५५५, ९८३४२३०४३०/०७१३२-२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

गडचिरोली
महासागर जिल्हा विशेष
रविवार, दि. ३१ ऑगस्ट २०२५ 

## आईंचवार यांनी केले गणपती आरतीचे पुस्तिकेचे वितरण

**चामोर्शी :** गौरी व गणेश चतुर्थीच्या तिसऱ्या दिवशी ऋषिपंचमी निमित्ताने मार्कंडादेव येथील मार्कंडेश्वर मंदिरात ऋषिपंचमी व्रत, उद्यापन, पुजाअर्चनेसाठी राज्यासह, राज्याबा. बहेरील हजारो महिला भाविकांची प्रचंड गर्दी केली होती. त्यानिमित्ताने सामा. जिक कार्यकर्ता अमोल आईंचवार यांनी सामाजिक बांधिलकी लोपासत महिला व भाविकांना गणपती आरती पुस्तक व फळाचे वितरण करून सामाजिक दायित्व पूर्ण केले.

मार्कंडादेव येथे गुरूवार २८ ऑगस्ट रोजी मार्कंडेश्वर मंदिराचे परिसरात ऋषिपंचमी निमित्ताने पहाटे ४ वाजतापासून भक्तांची गर्दी नदीघाटावर सुरू झाली होती. ऋषिपंचमी निमित्ताने महिला भाविक भक्त नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, यवतमाळ येथून हजारोंच्या संख्येने उपस्थित झाले होते. दरवर्षी हरी ओम आश्रम कडून उपवासाचा महाप्रसाद वाटप केल्या जातो. मंडळातील सेवक सदस्य सेवा भाव वृत्तीने स्वच्छतेची काळजी घेवून अन्नदान करतात. तर चामोर्शी येथील सामाजिक कार्यकर्ता अमोल आईंचवार यांनीसुध्दा सामाजिक बांधिलकी जोपासत महिला भाविकांना गणपती आरती पुस्तक व फळाचे वितरण करून सामा. जिक दायित्व जोपासले.

# पुलाचे निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करा

### अन्यथा आंदोलनः आम आदमी पार्टीचा इशारा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** आरमोरी तालुक्यातील कुलकुली नाल्यावर झालेल्या निकृष्ट पुलियाच्या कामाबाबत संबंधित ग्रामस्थांनी तक्रार करताच आझाद समाज पार्टीचे जिल्हाध्यक्ष राज बन्सोड, प्रभारी विनोद मडावी यांच्या नेतृत्वाखाली या पुलाची पाहणी केली असता, कामात प्रचंड अनियमितता आढळून आली. संबंधित कंत्राटदार तसेच अभियंत्यांच्या संगनमताने कामात हलगर्जीपणा करण्यात आल्याने ग्रामस्थांना मनःस्ताप सहन करावा लागत असल्याने संबंधित कंत्राटदारासह जबाबदार अभियंत्यावर कठोर कारवाई करण्यात यावी. अन्यथा, तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा



आझादच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

तालुक्यातील कुलकुली ग्रामस्थांच्या तक्रारी अनुषंगाने पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कुलकुली नाल्यावर उभारण्यात आलेल्या पुलाची पाहणी करीत ग्रामस्थांशी संवाद साधला. सदर पुलाचे निकृष्ट बांधकामामुळे या मार्गावर बसेस बंद पडत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या. यामुळे शालेय विद्यार्थ्यांना मनःस्ताप सहन करावा लागत असून, त्यांचे नुकसान होत आहे. या पुलालगतच्या मार्गावर गिट्टी न टाका माती व मुरुमाचा भरणा केला असल्याने वाहने स्लिप होणे, फसण्याचे प्रकार वाढले आहेत.

यामुळे अपघाताचीही शक्यता बळावली आहे. संबंधित कंत्राटदार व बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचा आरोप आजादच्या पदाधिकाऱ्यांनी केला. विना रॉयल्टी अवैध मुरुमाचा वापर करणे, गिट्टी न टाकता माती - मुरमाचा भरणा, रोलन न फिरविण्यात आल्याने रस्ता असुरक्षित झाला असून, अपघात होण्याची शक्यता बळावली आहे. या मार्गावरील बस बंद असल्याने शाळकरी विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे निकृष्ट काम करणाऱ्या संबंधित कंत्राटदारास काळ्या यादीत टाकण्यात यावे, संबंधित जबाबदार अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी. तसेच तत्काळ रस्त्याची दुरुस्ती न केल्यास ग्रामस्थांना घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आझाद पदाधिकाऱ्यांसह कुलकुली ग्रामवासीयांनी दिला आहे.

### पाच दिवसांत कार्यवाही करूः नीता ठाकरे

यासंदर्भात सा. बां. विभागाच्या अधीक्षक अभियंता नीता ठाकरे यांच्याशी आझादच्या शिष्टमंडळाने भेट देऊन निवेदन सादर करीत कुलकुली पुलासंदर्भात सविस्तर चर्चा केली. आगामी ५ दिवसात उचित कार्यवाही करून गावकऱ्यांना दिलासा देण्याचे ठोस आश्वासन ठाकरे यांनी दिले. तसेच अधीक्षक अभियंता ठाकरे यांनी संबंधित कंत्राटदार व अभियंतांशी संपर्क साधून तत्काळ दुरुस्तीचे आदेश दिले. यावेळी पक्षाचे प्रदेश सचिव धर्मानंद मेश्राम, जिल्हा प्रभारी विनोद मडावी, जिल्हाध्यक्ष राज बन्सोड, नागसेन खोब्रागडे, सुरेंद्र वासनिक, मोसम मेश्राम उपस्थित होते.

## देशाकरिता नेहमी प्रयत्नशिल राहा

### मान्यवरांचा सूर, कुरखेडात क्रांतिज्योती यात्रा



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** राष्ट्रसंताने लिहिलेली ग्रामगीता ही ग्रामनाथाकरिता अर्पण केली असून, यामध्ये विद्यार्थी जीवनाव. रसुद्धा प्रकाश टाकला आहे. राष्ट्रसंतांनी सांगितलेल्या सर्वतोपरी नको उच्च शिक्षण हे ते गेले मागील युगे सांगून आता व्हावा कष्टीक बलवान सुपुत्र भारताचाश या म्हणीप्रमाणे विद्यार्थ्यांनी शिक्षणापूर्तीच मर्यादित न राहता शिक्षण घेऊन भारताच्या कल्याणाकरिता नेहमी प्रयत्नशिल राहावे, असे आवाहन मान्यवरांनी केले.

क्रांतिज्योती यात्रेनिमित्त सोमवारी (दि. २५) कुरखेडा येथील श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरण पादुका व क्रांतिज्योती यात्रा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष तथा विश्व हिंदू परिषदेचे कार्याध्यक्ष वामनराव फाये होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य अशोक चारडे, यात्रा प्रमुख सुशील बुरडे, विठ्ठल सावरकर, राजेंद्र गाडगे, गजानन अजमिर, रथचालक विलास मेश्राम, मुक्ता हत्तीमा, नानाजी खुणे, रूपचंद दखणे, प्रल्हाद खुणे, सेवादास खुणे, पुरुषोत्तम उईके, विद्यालयाचे प्राचार्य तथा आदिवासी ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे सहसचिव नागेश्वर फाये उपस्थित होते. संचालन सेवानिवृत्त शिक्षक एन. एस. माकडे यांनी केले, तर आभार सेवानिवृत्त प्राचार्य श्यामराव सोनुले यांनी मानले.

# अल्पवयीन वाहनचालकांवर कठोर कारवाई करा

### पोलिस निरीक्षकांना निवदेनः 'मनसे'ची मागणी

**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. ३० :** अहेरी आणि आलापल्ली येथील रस्त्यांवर अल्पवयीन मुलांकडून वाहतूक नियमांचे होणारे उल्लंघन आणि त्यामुळे वाढलेल्या अपघातांवर अंकूश लावण्यासाठी अल्पवयीन वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी पोलिस निरीक्षकांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

गडचिरोली जिल्हा उपाध्यक्ष सोनल वाकुलकर यांनी याबाबत अहेरी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षकांना पत्र दिले आहे. या पत्रात अल्पवयीन मुलांवर आणि त्यांच्या पालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, अहेरी आणि आलापल्लीच्या रस्त्यांवर वाहतूक कोंडी आणि नियमांची पायमल्ली ही एक गंभीर समस्या बनली आहे. विशेषतः अल्पवयीन मुले कोणत्याही वैध परवान्याशिवाय बेदरकारपणे वाहने चालवत आहेत, ज्यामुळे अपघातांचा धोका मोठ्या प्रमाणात



#### शाळांमध्ये जनजागृती मोहीम राबवा

पोलिसांनी वाहतूक विभागामार्फत स्थानिक शाळांमध्ये वाहतूक नियमांबद्दल जनजागृती मोहीम राबवावी. यामुळे विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच नियमांचे महत्त्व समजेल. वाहतूक नियम मोडताना आढळणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थ्यांच्या पालकांवर कायदेशीर कारवाई करावी. यामुळे पालक आपल्या मुलांना नियम पाळण्यास प्रोत्साहित करतील.

वाढला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या गंभीर स्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कारवाई करण्याची गरज आहे.

पोलीस निरीक्षक हर्षल एकरे यांनी सदर बाबीची गंभीरता समजून क्षणाचा विलंबन न करता कारवाई संदर्भात आदेश देण्यात आले. नागरिकांनीही आपल्या मुलांना वाहन चालवण्यासाठी देण्यापूर्वी नियमांचे पालन करण्यास प्रोत्साहित करावे, असे ते म्हणाले.

निवेदन देताना मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष सोनल वाकुलकर, तालुकाध्यक्ष प्रणित श्रीरामवार, राहूल पिट्टलवार, रितेश मोहुर्ले, संतोष गणमुकूलवार, अक्षय कोवे, करण गुरनूले ,शिवा रामगिरवार, प्रथम आईंचवार आदि उपस्थित होते.

# धानाचे चुकार अडकले, खरीपाचे नियोजन बिघडले

### चुकार तत्काळ देण्याची ॲड. उमेश वालदे यांची मागणी

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. ३० :** तालूक्यातील शासकीय आधारभूत धान खरेदी केंन्द्रात रब्बी हंगामातील धान विक्रीचे चूकारे मागील २ ते ३ महिण्यापासून थकीत असल्याने शेतकऱ्यांचा खरीप हंगामाचा नियोजन आरखडा बिघडला असून शेतकरी अडचणीत आलेला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने थकीत चूकारे अदा करण्यात यावे, अशी मागणी आनलाइन निवेदनाद्वारे कूरखेडा आविका संस्थेचे संचालक तथा नगरसेवक ॲड. उमेश वालदे यानी राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडे केली आहे.



तालूक्यात शासकीय धान खरेदी आदिवासी विकास महामंडळाचा वतीने प्राधिकृत आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था मार्फत करण्यात येते. या हंगामात खूल्या बाजारपेठेत धानाला अल्प भाव असल्याने बहूसंख्य शाशकीय धान खरेदी केंन्द्रावर धानाची विक्री केली आहे. मात्र मे व जून महिण्यात धानाची विक्री करूनही अद्याप धानाचे चूकारे अप्राप्त असल्याने शेतकरी अडचणीत आलेला आहे. खरीप हंगाम सूरू आहे, रोवणीची मजूरी, रासायनिक खते, औषधी खरेदी करण्याची गरज असताना त्याचाकडे पैसा नाही. हक्काचा पैसा असूनही थकीत चूकाऱ्यामुळे गरज भागविण्याकरीता शेतकऱ्यांना उसनवारी व कर्ज काढावे लागत आहे. सदर बाब लक्षात घेत तातडीने थकीत धानाचे चूकारे शेतकऱ्यांच्या बॅंक खात्यात अदा करावे, अशी मागणी आनलाइन निवेदनात आविका संचालक तथा नगरसेवक ॲड. उमेश वालदे यांनी केली आहे.

## येणापुरात रक्तदान व रक्तगट तपासणी शिबिर आज

**चामोर्शी :** सामाजिक कार्यात नेहमी अग्रस्थानी राहणारे अतुल गण्यारपवार यांच्या जन्मदिवसानिमित्त गण्यारपवार फउंडेशन चामोर्शी व जनहित ग्रामीण विकास बहुउद्देशीय संस्था येनापूर यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ३१ ऑगस्ट रोजी येनापूर येथे रक्तदान व मोफत रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिर सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत प्राथमिक आरोग्य पथक, येनापूर येथे घेण्यात येणार आहे. तरी या शिबिराच्या माध्यमातून रक्तदात्यांना आपला रक्तगट तपासून घेण्याची व थेट रक्तदान करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. नागरिकांनी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## तळोधी (मो) येथे पशु लसीकरण शिबिर

**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि. ३० :** पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता मानवासह जनावरांनाही विविध आजारांची लागण होते. त्याअनुषंगाने पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत केवळरामजी हरडे कृषी महाविद्यालय चामोर्शी येथील विद्यार्थ्यांनी तळोधी (मो) येथील पशुपालकांमध्ये जनजागृती करण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

घटसर्प हा रोग विषाणूजन्य असल्याने यावर निश्चित रामबाण उपचार नाही. त्यामुळे रोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लसीकरण करून नियंत्रण मिळवता येते. घटसर्प या रोगाचा गाय, म्हैस, शेळी यांसारख्या जनावरांमध्ये प्रादुर्भाव दिसतो. तापाची तीव्रता १०६ फॅरनहाइटपर्यंत जाते. गळ्याला सूज येते तसेच जीभही सुजलेली दिसून येते. खाताना तसेच गिळताना अत्याधिक त्रास होतो. घशातून घरघर आवाज येतो. तोंडातून लाळ वाहते आदी लक्षणे प्रामुख्याने दिसून येतात. जनावरे एक ते दोन दिवसात दगावतात, अशी माहिती पशुपालकांना देण्यात आली. यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आदित्य कदम, प्रा. प्रलय झाडे, प्रा. छबील दूधबळे, प्रा. निकिता येलमुले, प्रा. उषा गजभिये, प्रा. महेंद्र कुमार लिल्हारे, पशुसंवर्धन आणि दुग्धशास्त्र सहाय्यक प्रा. श्रीकांत सरदारे यांच्या मार्गदर्शनात सायली बुराडे, कशिष चांदेकर, खुशी चंदेल, वैष्णवी चिलके आणिअनुष्का गाडेवार यांनी सहकार्य केले.

# मुनघाटे महाविद्यालयात मेजर ध्यानचंद जयंती

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. ३० :** दंडकारण्य शैक्षणिक व सांस्कृतिक विकास संशोधन संस्था गडचिरोली द्वारा संचालित स्थानिक श्री गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय तथा विद्याभारती कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांच्या प्रमुख उपस्थितीत हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद्र यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागाद्वारे साजरी करण्यात आली.



याप्रसंगी प्राचार्य डॉ. राजाभाऊ मुनघाटे यांनी सर्वांना क्रीडा दिनाच्या शुभेच्छा देत महाविद्यालयाचा अतिशय उत्कृष्ट असा क्रीडा विभाग असून या विभागाने आज पर्यंत रातुम नागपूर विद्यापीठ नागपूर व गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली च्या विविध संघात आपले नैपुण्य दाखवीत महाविद्यालयाचा नावलौकिक प्राप्त केला. महाविद्यालयाचे १५० हून अधिक विद्यार्थी कलर होल्डर ठरली असून याबळावर विविध ठिकाणी नोकरीच्या संधी सुद्धा अनेकांना प्राप्त झालेल्या आहेत. अशीच परंपरा यापुढेही कायम राहील, अशा आशावाद व्यक्त करीत पुढील वाटचालीच्या शुभेच्छा प्राचार्य डॉ. मुनघाटे यांनी दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी.एस.खोपे, शारीरिक शिक्षण विभाग प्रभारी प्रमुख डॉ. प्रमेश दाणी, डॉ. दशरथ आदे, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## परदेश शिष्यवृत्तीला १ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**गडचिरोली :** २०२५-२६ अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यां करीता परदेशात पदव्युत्तर पदवी व पीएच. अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांकडून डी. योजनेंतर्गत अर्ज मागविण्यासाठी शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाने मंजुरी दिली आहे. या योजनेंतर्गत चालू शैक्षणिक सत्राकरीता विद्यार्थ्यांकडून १८ जुलैपासून प्रत्यक्षरित्या व ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. याबाबत महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर ताज्या घडामोडीमध्ये विस्तृत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस मुदतवाढ देण्यात आली असून, अर्ज करण्याची अंतिम मुदत १ सप्टेंबर आहे.

## विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्तीची शपथ

**गडचिरोलीः** चामोर्शी तालुक्यातील मुरखळा चक येथील प्रबुद्ध हायस्कूल येथे तंबाखू व दारूमुक्ती याबाबत मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सर्व शालेय विद्यार्थ्यांनी तंबाखू व दारूच्या व्यसनातून मुक्त राहण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक टिचकुले यांनी भूषविले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मुक्तीपथ तालुका संघटक आनंद इंगळे होते. प्रमुख अतिथी म्हणून आनंद दुधे, भूपेश कुळवे, दिलीप बोधे, पंकज येलम. ले, डाखरे, वनवे, गोहने, शिक्षकेतर कर्मचारी मनीषा बांबोळे , कवडूजी येमजेलवार, ऋषीजी वासेकर, नेहाल आभारे प्रामुख्याने उपस्थित होते.

यावेळी आनंद इंगळे यांनी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना व्यसनामुळे होणारे दुर्धर आजार याबद्दलची संकल्पना स्पष्ट करून आपण व्यसनमुक्त राहण्यासाठी काय काय कृती केली पाहिजे याबाबत माहिती दिली. व्यसनामुळे होणारे दुष्परिणाम समजून सांगितले व पुढे कोणतेही व्यसन करणार नाही याची शपथ विद्यार्थी व शिक्षकांनी यावेळी घेतली व आपले महाविद्यालय दारू व तंबाखूमुक्त असले पाहिजे, असा ठराव यावेळी घेण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन भूपेश कुळवे तर आभार दिलीप बोधे यांनी मानले.

## रखडलेले पुलाचे बांधकाम तत्काळ करा; अन्यथा चक्काजाम

**गडचिरोलीः** तालुक्यातील अत्यंत महत्वाचा व वर्दळीचा मार्ग असलेल्या गडचिरोली- चामोर्शी राष्ट्रीय महमार्गावरील पोर व पोटफोडी नदीवरील रखडलेले पुलाचे बांधकाम त्वरित करण्यात यावे. अन्यथा, चक्काजाम आंदोलन छेडण्याचा इशारा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ब्राह्मणवाडे यांनी दिला. अतिदुर्गम गडचिरोली जिल्ह्यात दळणवळणाकरीता रस्ते हाच प्रमुख मार्ग आहे. मात्र, गडचिरोली- चामोर्शी रस्त्यावरील शिवनीजवळील पोटफोडी नदी व तळोधी येथील पोर नदीवरील अर्धवट असलेल्या पुलामुळे या मार्गावरून प्रवास करणारूया प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडल्यामुळे सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात अपघाताला चालना मिळत असून, प्रवाशांना आपला जीव मुठीत घेऊन त्या ठिकाणी प्रवास करावा लागत आहे.

## मूर्तीकार, पेंटर यांना शासकीय कामे द्यावीत

**गडचिरोली :** जिल्ह्यातील मूर्तिकार व पेंटर यांना शासकीय काम उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी गडचिरोली जिल्हा पेंटर बहुउद्देशिय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकरी यांना दिलेल्या निवे. दनातून केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, गडचिरोली जिल्ह्यात पेटींग व अन्य कामे ज्यांचा पेंटींग, कलेशी संबंध नाही अशा ठेकेदारांना दिली जात आहेत. यामुळे स्थानिक पेंटर, मुर्तिकारांना बेरोजगारीचे जीवन जगावे लागत आहे.

# आदिवासी चळवळीतील अनमोल हिरा हरपला

### पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे : स्वराज्य यात्रिक पुस्तकाचा विमोचन सोहळा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. ३० :** गडचिरोली जिल्ह्याच्या वर्धापनदिनी हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण आहे. मोहन हे गांधी-विनोबांच्या विचारांनी प्रेरित होते.१९७५ मध्ये विनोबांशी झालेल्या संवादानंतर त्यांनी ग्रामस्वराज्य, अहिंसा आणि आदिवासी हक्कांसाठी अपार जिद्दीने कार्य केले. मेंढा लेखा गावातील आदर्श प्रयोग त्यांच्याच संकल्पनेची फलश्रुती आहे. आदिवासी चळवळीतील एका नाविन्यपूर्ण चळवळीतील अनमोल हिरा नियतीने आमच्याकडून हिरावून घेतला, असे प्रतिपादन



पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी केले.

ज्येष्ठ पर्यावरणवादी आणि स्वराज्य कार्यकर्ता स्व. मोहन हिराबाई हिरालाल यांच्या कार्यावर आधारित 'स्वराज्य यात्रिक' या पुस्तकांचे प्रकाशन गाणली समाज सभागृह, गडचिरोली येथे पार पडले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ समाजसेविका सुमती मुनघाटे होत्या. प्रमुख उपस्थितीत आदिवासी सेवक डॉ. देवाजी तोफा, ज्येष्ठ पत्रकार रोहिदास राऊत, डॉ. कन्ना मडावी तसेच स्वर्गीय मोहन हिराबाई हिरालाल यांच्या सहचरणी सविता तारे उपस्थित होत्या.

मोहन यांच्या जीवनप्रवासावर आणि कार्यावर मित्र परिवारांनी त्यांच्याप्रती आपल्या भावना व्यक्तकरण्यासाठी अनेक लेखांचे एकत्रीकरण करून स्वराज्य यात्रिक नावाचे पुस्तक तयार केले. यापुस्तकचे संपादन डॉ. पराग चोळकर यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजक आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था कुरखेडा, सृष्टी संस्था शंकरपूर व ग्रामसभा मेंढा यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला कोरची, कुरखेडा, धानोरा, वडसा, आरमोरी या तालुक्यातील ग्रामसभा, महाग्राम सभा सदस्य, पदाधिकारी आणि ग्रामस्थ बहूसंख्येने उपस्थित होते.

मोहन यांच्या कार्य प्रवासावर प्रकाश टाकत डॉ. देवाजी तोफा म्हणाले की, '१९८३-८४' मध्ये आदिवासी संस्कृती सोबत काम करीत असतांनाजल-जंगल-जमीन या विषयाला केंद्रस्थानी ठेवून आदिवासीच्या हक्काचे बीजारोपण केले आणि त्यांच्याच प्रेरणेने मेंढालेखा ग्रामसभा सक्षम झाली. हि प्रक्रिया पुढे घेऊन जाण्यासाठी मोहनच्या विचाराची गरज आहे, असे ते म्हणाले. प्रमुख पाहुण्याचे परिचय शुभदा देशमुख यांनी केले. प्रास्ताविक डॉ. सतीश गोगुलवार संचालन सविता सादमवार यांनी केले तर आभार केशव गुरनुले यांनी केले.

## विद्यार्थीनींनी अन्याय, अत्याचाराची माहिती द्यावी

### सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रियंका आघाव यांचे आवाहन रू मार्गदर्शन शिबिर

**तालुका प्रतिनिधी**
**कुरखेडा दि. ३० :** काही अन्याय, अत्याचार झाल्यास घडलेल्या घटनेसंदर्भात विद्यार्थिनींनी आपल्या जवळच्या मैत्रिणी, आईवडिलांना माहिती द्यावी, असे आवाहन सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रियंका आघाव यांनी केले.

स्थानिक श्रीराम विद्यालय तथा उच्च माध्यमिक विद्यालयात संस्था सहसचिव तथा प्राचार्य नागेश्वर फाये यांच्या मार्गदर्शनात 'रस्ता सुरक्षा', 'गुड टच व बॅड टच' एकदिवशीय मार्गदर्शन शिबिर संस्कार पब्लिक स्कूल कुरखेडाच्या सभागृहात पार पडले, यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी शाळा समिती.



चे अध्यक्ष वामनराव फाये होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संस्था सचिव दोषहर फाये, प्राचार्य नागेश्वर फाये, शिक्षिका एल. आर. राऊत, पोलिस उपनिरीक्षक दयानंद भोम्बे उपस्थित होते.

यावेळी एपीआय प्रियंका आघाव यांनी विद्यार्थिनींना प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून 'गुड टच व बॅड टच' संदर्भात माहिती समजून सांगितली. पोलिस उपनि. रीक्षक दयानंद भोम्बे यांनी वाहतुकीचे १९८८ चे नियम व २०१९ चे वाहतुकीतील दंडात झालेल्या वाढीवर मार्गदर्शन केले. तसेच हेल्मेट व सीट बेल्ट लावून गाडी चालवावी. वाहतुकीचे नियम पालन करावे. ट्राफिक सिग्नलची ओळख सर्वांना असावी, असेही ते म्हणाले. यावेळी वामनराव फाये यांनी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिस्तीचे महत्व पाडून रस्ता सुरक्षा व व्यसनापासून दूर राहावे, असे आवाहन केले.

